**विषयः-** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी
प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत.
**( सर्व धार्मिक स्थळावरील भाविकांची गर्दी नियंत्रित करणेबाबत.)**

## जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

क्र.२०२०/आरबी-१/डे-२/टे-४ /कोरोना/सीआर-
दि. १७/०३/२०२०

वाचाः-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/ आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.
२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे कलम २,३ व ४
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.
४) या कार्यालयाचे समक्रमांकीत पत्र दि.१५.०३.२०२०

**आदेशः-**

ज्याअर्थी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

आणि त्याअर्थी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार संदर्भात नमुद अधिसुचना दिनांक १४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे त्यानुसार या कार्यालयाचे संदर्भ क्र.४ अन्वये नांदेड जिल्हयात सामाजिक, सांस्कृतीक, राजकीय, धार्मिक, क्रिडाविषयक कार्यक्रमांना पुढील आदेश होईपर्यंत प्रतिबंधीत करण्यात आले आहे.

तथापि माझ्या असे निदर्शनास आले आहे की, नांदेड जिल्हयात धार्मिक स्थळाच्या ठिकाणी मोठया प्रमाणात भाविकांची गर्दी होत आहे. त्यामुळे जिल्हयात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी नांदेड जिल्हयातील सर्व मंदीर, मस्जीद, गुरुव्दारा, गिरीजाघर, बौध्द विहार व इतर धार्मिक व प्रार्थना स्थळाच्या ठिकाणी एका वेळी पाच पेक्षा अधिक भाविक एकत्र जमण्यास दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत प्रतिबंध करण्यात येत आहे.

या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील व स्थानिक स्वराज्य संस्थेची यांची राहील त्यांनी याबाबत त्यांचे यत्रणेमार्फत वेळोवेळी पहाणी करुन अहवाल सादर करावा.

(डॉ. विपीन इटनकर) भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
४) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
५) पोलीस अधीक्षक, नांदेड
६) उपजिल्हाधिकारी (सामान्य), जि.का.नांदेड
७) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
८) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
९) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद, नगरपंचायत, जि.नांदेड
१०) जिल्हा वक्फ बोर्ड अधिकारी, नांदेड

**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**